# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

## शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जानेवारी-२०१६

### (संगणक टायपिंग करिता)

**(GOVERNMENT COMMERCIAL CERTIFICATE EXAMINATION (GCC-TBC) JAN. - 2016)**

**(FOR COMPUTER TYPING)**

# अधिसूचना
# व
# ऑनलाईन
# आवेदनपत्र स्विकृती
# कार्यक्रम


१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१.

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६१२३०६६/६७**

**E-mail – mscepune@gmail.com**

**Website : www.mscepune.in**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (संगणक टायपिंग) जानेवारी २०१६**

# परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. महावीर माने | अध्यक्ष |
| २. | श्री. आर. व्ही. गोधने | आयुक्त |
| ३. | श्री. आर. व्ही. गोधने | उपआयुक्त |
| ४. | श्री. भि.दि. फडतरे | उपआयुक्त |
| ५. | श्री. राजेश गो. क्षीरसागर | सहायक आयुक्त |
| ६. | श्री. काथवटे ए. एस. | मूल्यमापन अधिकारी (जी.सी.सी. मूल्यमापन) |
| ७. | श्री. पी. एच. गायकवाड | अधीक्षक (जी.सी.सी. प्रशासन) |
| **ऑनलाईन माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्याकरीता ०२०-२६१२३०६६/६७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.** | | |

**परीक्षा प्राधान्य :**

क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./अधि/जाने.-२०१६
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक : १३/०१/२०१६

**प्रति,**

**संस्थाप्रमुख ,**
**सर्व शासनमान्य संगणक टायपिंग,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा : जानेवारी-२०१६ (GCC-TBC ३० w.p.m.) अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्र स्विकृती कार्यक्रम.**

राज्यातील शासनमान्यता प्राप्त संगणक टायपिंग संस्थामधील नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत जानेवारी-२०१६ मध्ये शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC ३० w.p.m.) ऑनलाईन/ऑफलाईन घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या संगणक टायपिंग संस्थेमार्फत विषय व गतीनिहाय स्वतंत्र आवेनदपत्रे ऑनलाईन मागविण्यात येत आहेत.

**अ) परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :**

१. उमेदवार शासनमान्य शाळेतून किमान ८ वी उत्तीर्ण असावा.
२. शासनमान्य संगणक टायपिंग संस्थेत आठवडयात किमान ४ तासांप्रमाणे परिक्षेच्या तारखेपूर्वी ४ महिने किंवा ८० घड्याळी तास नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. (घड्याळी तास ६० मिनिटांचा असतो.)

**आ) परीक्षेचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | दिवस | वार | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | पहिला | शुक्रवार | दि. २९/०१/२०१६ |
| २. | दुसरा | शनिवार | दि. ३०/०१/२०१६ |
| ३. | तिसरा | रविवार | दि. ३१/०१/२०१६ |
| ४. | चौथा | सोमवार | दि. ०१/०२/२०१६ |

**इ) शुल्क:-**

१. **परीक्षा शुल्क** :- रु. ५००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी
२. **नोंदणी शुल्क** :- संगणक टायपिंग संस्थांसाठी रु. १०००/- प्रतिवर्षी.
(नोंदणी शुल्क जानेवारी ते डिसेंबर या कालावधीसाठी आकारण्यात येईल. वर्ष २०१५ चे नोंदणी शुल्क भरल्याच्या पत्राची व चलन अथवा डी.डी.ची छायांकित प्रत जोडावी.)

**ई) शुल्क भरण्याची पध्दत:-**

१. संस्थेने सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेत स्थळावर देण्यात आलेल्या **ऑनलाईन चलनाद्वारेच** भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत खाते क्रमांक 31178451983 वर भरावे.
२. चलनाच्या तीन प्रतींपैकी दोन प्रती सोबत जोडाव्यात.

३. चलनाच्या पाठीमागे संस्थेचे नांव व संस्था कोड क्रमांकाचा शिक्का उमटवावा. **सदरच्या चलनाचा क्रमांक, दिनांक, रक्कम व शाखा कोड क्रमांक ऑनलाईन नमूद करावयाचा आहे**.

४. सदर चलनाच्या माहिती शिवाय आवेदनपत्र भरता येणार नाही याची नोंद घेण्यात यावी. **(इतर कोणत्याही चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यात येऊ नये, ते ग्राह्य धरण्यात येणार नाही व परत करण्यात येणार नाही.)**

**उ) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकृतीचा कार्यक्रम :-**

१. परीक्षार्थींनी भरलेल्या नियमित परीक्षा शुल्काचे चलन ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी **:- दि. १३/०१/२०१६ ते १७/०१/२०१६**

२. नियमित परीक्षा शुल्काचे चलन भरण्याचा कालावधी **:- दि. १८/०१/२०१६अखेरपर्यंत**
(परीक्षा शुल्क बँकेत भरणे व भरलेल्या चलनाची माहिती ऑनलाईन भरणे)

३. परीक्षार्थ्यांचे नियमित ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा अंतिम दिनांक व नियमित आवेदनपत्राची/परीक्षा विद्यार्थी यादी प्रिंट आऊट काढणे **:- दि. १९/०१/२०१६अखेरपर्यंत**

**टिप :-** ऑनलाईन आवेदनपत्राची एक प्रिंट काढुन विद्यार्थ्यांची स्वाक्षरी व संस्थेच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थेने आपल्या दप्तरी जतन करून ठेवावी.

४. **विलंब / अतिविलंबाची सवलत रद्द करण्यात आली आहे.**

- **टंकलेखन/लघुलेखन संस्थांनी खालील कागदपत्रे आपल्या संस्थेच्या सही व शिक्क्याने साक्षांकित करुन परिषदेच्या संकेतस्थळावर** Upload **करावीत.**

१. संस्था मान्यता आदेश प्रत (संगणकाची कमाल विद्यार्थी क्षमता असलेली)

२. परीक्षा शुल्क चलन प्रत

३. परीक्षा विद्यार्थी यादी (विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरीसह)

४. संस्थाप्रमुखाचे प्रतिज्ञापत्र

५. संस्थाप्रमुखाचे हमीपत्र

**ऊ) बँकेचे चलन वाटप :-**

परीक्षा शुल्क भरण्यासाठी आवश्यक बँकेचे चलन परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत, त्याचा वापर करण्यात यावा. **(इतर कोणत्याही चलनाचा वापर करू नये)**

**ए) आवेदनपत्राची उपलब्धता:-**

आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहेत. सदरचे आवेदनपत्र परिषदेच्या संकेतस्थळावर **दिनांक १३/०१/२०१६ रोजी** उपलब्ध होईल.

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

www.mscepune.in वेबसाईटला भेट देणे.

⇩

GCC Examination या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

Create Challan या बटनावर क्लिक करून चलन बनवा व प्रिंट घ्या.

⇩

चलनाने शुल्क बँकेत भरून पुन्हा Login करा.

⇩

Upload बटनावर Click करून परीक्षा शुल्क, अनामत रक्कम, नोंदणी शुल्क- २०१५ चे चलन Scan करून एकत्रित Pdf मध्ये Online upload करा

⇩

आपल्या संगणक संस्थेची कमाल विद्यार्थी क्षमता (संख्या) (capacity) मान्यता आदेशाप्रमाणे नोंदवा.

⇩

Candidate List समोरिल Apply बटनावर क्लिक करून त्यामधील मुद्देनिहाय अचुक माहिती भरा.

⇩

सर्व माहिती अचूक भरल्याची पुन्हा खात्री करूनच Update बटनावर क्लिक करा.

⇩

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करून दप्तरी जपून ठेवावी.

⇩

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झाल्यानंतरच  Exam Candidate list ची प्रिंट घ्यावी

⇩

Upload Exam Document बटनावर Click करून पृष्ठ क्र. ४ वर दिल्यानुसार सर्व कागदपत्रांची एकत्रित Pdf Online Upload करा.

## ऐ) <u>ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना</u> :-

### A. <u>सर्वसाधारण सूचना</u> :-

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता प्रथमतः परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

२. सदर संकेत स्थळावरील G.C.C. Examination वर Click करावे. त्यानंतर स्क्रीनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती भरावी व Login करावे.

३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना चुका होऊ नयेत म्हणून संस्थाचालकांनी/प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आवेदनपत्र अचूक भरावे.

४. पुन्हा Login केल्यावर स्क्रिनवरील Create C. T. Exam Challan वर Click करून चलनाची प्रिंट काढुन परीक्षा शुल्क बँकेत जमा करावे.

५. Login केल्यानंतर स्क्रीनवर Upload C. T. Exam Challan हा बॉक्स दिसेल त्यामध्ये परीक्षा शुल्क, नोंदणी शुल्क सन २०१५ व अनामत रक्कम या चलनांची एकत्रित pdf तयार करून ती Upload करावी.

६. चलन Upload केल्यानंतर संस्थेची कमाल विद्यार्थी क्षमता (Capacity) संख्येच्या स्वरुपात नोंदवावी. शिक्षण उपसंचालक यांचेकडून मिळालेल्या मान्यता आदेशात (संगणक टायपिंगकरिता) नमूद केलेली कमाल विद्यार्थी क्षमता अचूकपणे नोंदवावी. एकदा नोंदविलेली क्षमता (संख्या) पुन्हा बदलता (Edit करता) येणार नाही.

७. **त्यानंतरच स्क्रिनवर विद्यार्थी यादी दिसेल. विद्यार्थ्यांच्या नावासमोरील Apply बटनावर क्लिक करावे.**

८. Apply बटनावर Click केल्यानंतर Gender, General Register no. व subject (English/Marathi/Hindi ३० W.P.M.) Handicaped या बाबी नमुद करावेत व परीक्षा केंद्र ड्रॉपडाऊन मधुन Select करावे. त्यानंतर Update बटनावर Click करावे. Update या बटनावर Click केल्यानंतर आवेदनपत्रामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

९. **Update केलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन नाव व संस्था कोड लिहावा व आपल्या दप्तरी जपून ठेवावी.**

१०. Upload Exam Document बटनावर Click करून पृष्ठ क्र. ४ वर दिलेल्या १ ते ५ कागदपत्रांची एकत्रित Pdf Online Upload करावी.

## ओ) <u>संस्थाप्रमुख व विद्यार्थी यांच्यासाठी महत्त्वाच्या बाबी</u> :-

१. **सदर परीक्षा ही फक्त जी.सी.सी.-टी.बी.सी. ३० श.प्र.मि. (मराठी/हिंदी/इंग्रजी) या विषयाकरीता घेण्यात येणार आहे.**

२. **परीक्षेची बॅच परीक्षा परिषदेकडून प्रवेशपत्रावर देण्यात येईल. परिषदेकडून देण्यात आलेले बॅच यात कोणताही बदल केला जाणार नाही.**

३. परीक्षेपूर्वी ८ दिवस अगोदर पात्र उमेदवारांची **प्रवेशपत्रे (हॉल तिकीट)** संस्थांना परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन दिली जातील. त्यानुसार संस्थांनी आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांची प्रिंट काढून संस्थेच्या सही व शिक्क्यासह परीक्षेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर विद्यार्थ्यांना वितरीत करावीत.

४. ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये उमेदवाराचे नाव व नावाचे इंग्रजी स्पेलिंग, विषय, उमेदवाराची स्वाक्षरी याबाबतचा तपशील अचूक नोंदविण्यात यावा.

- **फोटो व सही बदल किंवा नावातील स्पेलिंग मध्ये प्रवेशपत्रावर परिषदस्तरावर संगणकामुळे चूक झाली असल्यासच परिषदेकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर परीक्षेच्या निकालापुर्वी ऑनलाईन आवेदनपत्रानुसार बदल करून देता येईल. ही दुरूस्ती ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये भरलेल्या माहितीनुसारच केली जाईल.**
- **मात्र ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये संबंधीत संगणक टायपिंग संस्थेकडुन फोटो व सही बदल किंवा नावातील स्पेलिंग मध्ये चूक झालेली असल्यास कोणत्याही परिस्थितीत बदल करून दिला जाणार नाही, याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी. त्याकरिता संस्थांनी आवेदनपत्राची एक प्रिंट काढून ठेवावी.**

५. **परीक्षार्थीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची उमेदवारांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.**

६. परीक्षा शुल्काच्या चलनावर दिनांक, स्वाक्षरी, संस्थेचे नांव व सांकेतांक असल्याची खात्री करावी.

७. प्रवेशपत्र जाहिर झाल्यानंतर पत्रव्यवहार करताना विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्राची छायांकित प्रत पाठविणे आवश्यक आहे अन्यथा अशा पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. त्यासाठी प्रत्येक आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी.

८. **अंध विद्यार्थ्यांबाबत :-** अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासनाने शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रः बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र वाचकाने (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग दोन साठी (गती उतारा) ७ मिनिटां ऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यास शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. ३१ डिसेंबर २००१ नुसार मान्यता दिलेली आहे.

९. **अपंग विद्यार्थ्यांबाबत :-** अपंग विद्यार्थ्यांना टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अवयवामध्ये म्हणजे हात किंवा बोटे यामध्ये ६० % टक्के किंवा त्याहुन अधिक कायम स्वरूपी अपंगत्व आलेले असल्यास व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हिल सर्जन) तसे प्रमाणित केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा, या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी अपंग उमेदवारास ७ मिनिटां ऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ अधिक मिनिटांची सवलत देण्यास शासनाने, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.:बीजीई-१०९४/(७५/९४)/माशि-८, दि. ३० ऑक्टोबर १९९५ नुसार मान्यता दिलेली आहे.

१०. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करुन सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची/तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल, तसेच संबंधित संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

११. उमेदवार, संस्थाप्रमुख व प्राचार्य यांनी आवेदनपत्रावरील Update या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.

**१२. परीक्षार्थीचे एका विषयासाठी एकच आवेदनपत्र भरावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील, त्यामुळे याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. परीक्षार्थींनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाप्रमुखांनी खात्री करावी. तसे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून घेऊन आपल्या दप्तरी ठेवावे.**

**१३. संस्थाप्रमुखाने कोणत्याही अनधिकृत संगणक टंकलेखन संस्थेच्या विद्यार्थ्याचे आवेदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरु नयेत. तसे निदर्शनास आल्यास सदर भरलेली सर्व ऑनलाईन आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील व आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

१४. **उपस्थितीबाबत :-**

**विद्यार्थ्यांची परीक्षेपर्यंतची उपस्थिती किमान ८०% असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षेपर्यंत ८०% उपस्थिती म्हणजेच ४ महिने किंवा ८० घड्याळी तास प्रशिक्षण पुर्ण होत नाही, अशा विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे वितरीत करु नयेत, ती परिषदेस परत करावीत. आपण प्रवेशपत्रे वितरीत केल्यास व असे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झालेचे परिषदेच्या निदर्शनास आल्यास विद्यार्थ्यांची सदर परीक्षेची संपादणुक रद्द करण्यात येईल व आपल्या संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. याबाबत भविष्यात तक्रार प्राप्त होऊन त्यात सत्यता आढळुन आल्यास त्याकरिता संस्थाप्रमुख म्हणून आपण सर्वस्वी जबाबदार रहाल.**

**स्वाक्षरीत/-**
**(आर. व्ही. गोधने )**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४११ ००१.**

**प्रत माहितीस्तवः-**

१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य.
२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
३. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)
४. कुलसचिव (सर्व विद्यापीठ), महाराष्ट्र राज्य.
५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

# संस्थाप्रमुखांचे प्रतिज्ञापत्र

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
## शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जानेवारी-२०१६
## (G.C.C. - T.B.C.- ३० W.P.M.)

**संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता :** **संस्था कोड :**

मी संस्थाप्रमुख------------------------------------------------------------,जि. ---------------------, जी.सी.सी. परीक्षा (GCC-TBC) जानेवारी-२०१६ संस्थेमधील विद्यार्थ्यांबाबत व संगणकाबाबत खालील प्रमाणे माहिती देत आहे.

| अ.क्र. | संगणक मशिन संख्या | विद्यार्थी संख्या | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

वरील प्रमाणे मी दिलेली माहिती खरी आहे व मान्यता आणि संचालन नियम १९९१, सुधारित नियमावली २०१४ च्या नियमावलीत निर्देशित केल्यानुसार विद्यार्थी सदर परीक्षेत बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये काही चूक आढळल्यास माझ्यावर कारवाई करण्यात येईल याची मला पुर्ण जाणीव आहे, तसेच काही त्रुटी आढळल्यास मी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत घेतलेल्या जी.सी.सी. परीक्षेच्या (GCC-TBC) कोणत्याही स्तरावर चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे.

**संस्थाप्रमुख सही व शिक्का**

## सर्व संस्थाप्रमुखांनी पुढील नमुन्यात हमीपत्र सादर करावे.

## हमीपत्राचा नमुना

मी श्री/सौ-----------------------------------------------,संस्थाप्रमुख, -------------------------संगणक टायपिंग इन्स्टिटयुट,-----------------------------------------------------सादर करतो/करते की,

- आमच्या संस्थेचे सन २०१५ या वर्षाचे नोंदणी शुल्क भरलेले आहे.
- आवेदनपत्रे सादर करण्यात आलेल्या सर्व परीक्षार्थींची सदर परीक्षेच्या सत्राअखेरीस किंवा परीक्षेच्या तारखेपर्यंत किमान उपस्थिती ८० % पेक्षा कमी असल्यास त्यांची आवेदनपत्र रद्द करण्यासाठी परिषदेस कळविण्यात येईल. उपस्थिती संबंधात काही तक्रारी उद्‌भवल्यास त्या परीक्षार्थ्याचे परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर आवेदनपत्र रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच सदर सर्व परीक्षार्थ्यांची अर्हता व पूर्व अट पूर्तता केली असल्याची मी खात्री केली आहे.
- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) जानेवारी-२०१६ साठी माझ्या संस्थेतून प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची आवेदन पत्रे, परीक्षा विद्यार्थी यादी व इतर कागदपत्रातून भरलेली माहिती मी स्वतः तपासून बरोबर असल्याची खात्री करून घेतली आहे.
- विद्यार्थ्यांना परीक्षेबाबतची सर्व माहिती देण्यात आली असून तद्‌नंतर आवेदन पत्रे व परीक्षा विद्यार्थी यादीवर स्वाक्षरी घेतली आहे.
- या संस्थेमार्फत प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी किमान इ. ८ वी उत्तीर्ण झाले आहेत / अर्हताप्राप्त आहेत.
- आवेदनपत्रे व परीक्षा विद्यार्थी यादी या मध्ये तफावत असल्यास त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस संस्थाप्रमुख म्हणून सर्वस्वी माझी जबाबदारी राहील.
- सदर माहितीत यानंतर कोणताही बदल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या पूर्व परवानगीशिवाय केला जाणार नाही, याची मला जाणीव आहे.

**तसेच उपरोक्त बाबीतील त्रुटी संदर्भात भविष्यात प्रश्न उपस्थित झाल्यास अगर तक्रार प्राप्त होऊन त्यात सत्यता आढळुन आल्यास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे जो निर्णय घेईल तो संस्थाप्रमुख म्हणून मला मान्य राहील.**

| | |
|---|---|
| स्थळ :- | स्वाक्षरी :- |
| दिनांक :- | नांव :- |
| संस्था कोड क्र.:- | संगणक टायपिंग संस्थेचा शिक्का |

# परीक्षा विद्यार्थी यादी नमुना

# G.C.C. EXAMINATION (GCC-TBC- 30 W.P.M.) JAN.- 2016- Candidate list

**PAGE NO. :** ____

**NAME OF THE INSTITUTE :** ____________________

**INSTITUTE CODE NO.:** | | | | | |

*USE CODE NUMBERS ONLY ( To be filled in by the Head of the Institute )

| Sr. No. | Name Of The Candidate | Form No. | Instt. Gen. Register No. | Subject Code No. | Signature Of Candidate |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

This is to Certify that the above enlisted candidates are the bonafide students of this Institute. They have fulfilled all the conditions required for appearing at the G.C.C. Examination as per the rules and each candidates has signed personally.

*** <u>Subject Code</u> :- 1) English GCC-TBC 30 W.P.M. = 15, 2) Marathi GCC-TBC 30 W.P.M. = 25, 3) Hindi GCC-TBC 30 W.P.M. = 35**

SEAL OF THE INSTITUTE

**Phone No.---------------------------**

**E-mail Id. ----------------------------**

SIGNATURE

HEAD OF THE INSTITUTE